HINDOOSTAN
MILLS

Date: 30-04-2021

The General Manager,
Department of Corporate Services – Listing,
BSE Limited,
Phiroze Jeejeebhoy Towers,Dalal Street,
Mumbai – 400 001

**Scrip Code: 509895**

Dear Sir,

Sub: NEWS PAPER ADVERTISEMENT

We are enclosing herewith News Paper advertisement published on 08-11-2020 in the Newspapers Free Press Journal (English) and Nav-Shakti (Marathi) for Unaudited Financial Results for the Quarter ended September 30, 2020.

Thanking you,

Yours Faithfully,
For **HINDOOSTAN MILLS LIMITED,**

**KAUSHIK N KAPASI**
**Company Secretary & Compliance Officer**
**FCS 1479**

**Corporate Office:** 402, Pharma Search House, B.G. Kher Road, Maya Nagar, Worli, Mumbai 400018, India.
**Registered Office:** Shivsagar Estate "D" Block, 8th floor, Dr. Annie Besant Road, Worli, Mumbai 400018, India.
T. +91-22-61240700 Email: contact@hindoostan.com
CIN: L17121MH1904PLC000195
www.hindoostan.com

## नागपुरात कोरोनामुळे ९ रुग्णांचा मृत्यू

**नागपूर –** नागपूर शहरात ३६६ रुग्ण कोरोनामुक्त झाले असतानाच ३३२ रुग्ण बाधित आढळले आहेत. तर २४ तासात ९ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. कोरोनामुक्तीची संख्या ९७४९८ इतकी झाली असून बरे होण्याचे प्रमाण ९३.३१ टक्के आहे. तर आजपर्यंत नागपुरात १०४५०९ रुग्ण बाधित आढळले आहेत. २४ तासात ९ रुग्णांचा मृत्यू झाला असून त्यात ६ रुग्ण शहरातील २ रुग्ण ग्रामीण भागातील तर १ रुग्ण इतर जिल्ह्यातील आहे. मृत्युसंख्या ३४५६ वर पोहोचली आहे.



## थोडक्यात....

### सर्वोत्कृष्ट वैज्ञानिकांच्या यादीत डॉ. संजय ढोबळे

**नागपूर –** जगभरातील सर्वोत्कृष्ट दोन टक्के वैज्ञानिकांच्या यादीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील भौतिकशास्त्राचे प्रोफेसर डॉ. संजय ढोबळे यांचे नाव नोंदले गेले आहे. अमेरीकेतील स्टॅडफर्ड विद्यापीठाने जगभरातील संशोधकांच्या शोध निबंधांचा अभ्यास करून सर्वाधिक शोधनिबंध प्रसिद्ध करणाऱ्या संशोधकांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. डॉ. ढोबळे यांचे नाव या यादीत समाविष्ठ झाल्याने विद्यापीठाचा नावलौकिक वाढला आहे. अमेरिकेतील स्टॅंडफोर्ड विद्यापीठातील डॉ. जॉन लोन्नडीस, डॉ. केवीन बॉयक आणि डॉ. जेरोन बास या तीन वैज्ञानिकांनी विश्वभरातील संशोधकांचा स्कोपस डाटा बेसवरून माहिती घेऊन शोध निबंधाच्या संख्येवरून जगभरातील संशोधकांची माहिती एकूण १७६ उपविषयामध्ये वेगळी केली. त्यानुसार प्रत्येक विषयात जगभरातील सर्वोत्कृष्ट दोन टक्के वैज्ञानिकांची यादी तयार केली आहे. त्यात डॉ. संजय ढोबळे यांना स्थान मिळाले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून डॉ. ढोबळे यांना आजवर विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांनी या यशाचे श्रेय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. निरज खटी व इतर प्राध्यापकांना दिले.

### अतिक्रमणविरोधी पथकाला दुकानदारांचा घेराव

**नागपूर –** शहरातील रस्त्यावर दुकाने थाटल्यामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होतो. या दुकानदारांवर कारवाईसाठी गेलेल्या अतिक्रमण पथकच्या कारवाईला दुकानदारांनी घेराव घालत जोरदार विरोध केला.धरमपेठ झोनअंतर्गत मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान रामगिरी परिसरातील अतिक्रमण यावेळी हटविण्यात आले. येथून पथक टीव्ही टॉवर परिसरात कारवाईसाठी पोहोचले. दरम्यान, दोनशेवर लोकांनी पथकाला कारवाईस विरोध केला. कर्मचाऱ्यांना घेराव घालत त्यांना शिवीगाळ केली. यादरम्यान तणाव निर्माण झाला होता. दुकानदार ऐकण्यास तयार नसल्यामुळे अखेर पोलिस प्रशासनाला पाचारण करण्यात आले. पोलिसांच्या उपस्थितीमुळे मनपा पथकाने या परिसरातील अतिक्रमणाचा सफाया केला. येथील रत्यावर आलेले दुकानांचे २७ शेड तोडले. ३ ओटे, २ चिकनची दुकाने तोडण्यात आली. रस्त्याच्या दोन्ही बाजूचे पाच ट्रक साहित्य जप्त करण्यात आले. याव्यतिरिक्त पथकाने गांधीबाग झोनमध्येही महाल, शिवाजी पुतळा, नंगा पुतळापर्यंत कारवाई केली.

### मास्क न लावणाऱ्या नागरिकांकडून दंड वसुली

**नागपूर –** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाचे जवानांनी मास्कशिवाय फिरणाऱ्या बेजबाबदार २५६ नागरिकांविरुध्द कारवाई केली आहे. त्यांच्याकडून प्रत्येकी ५०० रुपयाप्रमाणे १ लक्ष २८ हजार रुपयांचा दंड वसूल केला. आतापर्यंत सर्वाधिक कारवाई धरमपेठ झोन अंतर्गत करण्यात आलेली आहे. या झोन मध्ये ३५७१ बेजाबदार नागरिकांवर कारवाई करण्यात आली. आज मनपा उपद्रव शोध पथकाव्दारे लक्ष्मीनगर झोन अंतर्गत ३४, धरमपेठ झोन अंतर्गत ५६, हनुमाननगर झोन अंतर्गत ३०, धंतोली झोन अंतर्गत १२, नेहरुनगर झोन अंतर्गत १०, गांधीबाग झोन अंतर्गत १६, सतरंजीपूरा झोन अंतर्गत ११, लकडगंज झोन अंतर्गत १० येथे कारवाई करण्यात आली.

### हेल्मेट न घालणाऱ्या दुचाकीचालकांवर कारवाई

**अकोला –** राष्ट्रीय व राज्य महामार्गावर विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या ५० दुचाकी चालकांवर वाहतूक पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली. शहर वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी शहरालगतच्या महामार्गावर विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई सुरू केली. कारवाई करताना काही दुचाकी चालक हेल्मेट घातलेले सुद्धा आढळून आले. त्यांचा जागरूक नागरिक म्हणून गुलाबपुष्प देऊन पोलीस निरीक्षक गजानन शेळके यांनी त्यांचा सत्कार केला.

# कृषी विधेयकांमुळे शेतकऱ्यांवर अन्याय

## महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांची केंद्र सरकारवर टीका; राष्ट्रपतींना देणार स्वाक्षरीचे निवेदन

**प्रतिनिधी/कराड**

केंद्र सरकारने घाईघाईने मंजूर केलेला कृषी विधेयक कायदा शेतकऱ्यांवर अन्याय करणारा आहे. त्याचा शेतकऱ्यांवर गंभीर परिणाम होणार असल्याने राज्यभर त्याला विरोध सुरू आहे. त्यामुळे केंद्राचे हे काळे कायदे आम्ही राज्यात लागू करणार नसल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली.

केंद्र सरकारच्या कृषि विधेयक कायदा रद्द करण्याबाबत राज्य सरकारच्या भूमिकेबाबतच्या बाळासाहेब थोरात म्हणाले की, केंद्र शासनाने केलेल्या शेतकऱ्यांच्या हिताविरोधातील कृषी कायद्याविरोधात मंत्रिमंडळाची समिती गठीत करत आहे. या कायद्याला संपूर्ण देशात विरोध आहे. हरियाणा, पंजाबमध्ये




या कायद्याबाबत जनजागृती सुरू आहे. आधारभूत किंमतीमुळे तेथे शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे काम करत आहोत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसोबत घेऊन आम्ही या कायद्याविरोधात आंदोलन करत आहोत. या कायद्यामुळे शेतकऱ्यांला पुढचे परिणाम काय होतील, हेही समजावून सांगावे लागत आहे. या कायद्यामुळे साठेबाजीलाही वाव दिला जाणार आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मूठभर लोकांसाठी केंद्र सरकारने केलेला हा कायदा असून शेतकऱ्यांना तो हिताचा नाही. त्यामुळे सर्वांनीच या कायद्याला विरोध केला पाहिजे. काँग्रेसने दोन कोटी स्वाक्षरी मोहीम हाती घेतली असून काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी या स्वाक्षरीचे निवेदन राष्ट्रपतींना देणार आहेत. महाराष्ट्रात ५० लाख स्वाक्षरी झाल्या आहेत, असेही थोरात यांनी स्पष्ट केले.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व विलासराव पाटील-उंडाळकर यांचा एकत्रितपणे पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. त्यातून कार्यकर्त्यांना सक्रिय करण्याचे काम झाले आहे. कोणत्याही पक्षात मतभेद हे काही प्रमाणात असतातच, मात्र येथे पृथ्वीराज चव्हाण व विलासकाका उंडाळकर यांच्यात असणारे मतभेद आता दूर झाले आहेत. पक्षासाठी ते एकत्रितपणे काम करणार आहेत. राज्यात ज्या ठिकाणी अशा प्रकारे मतभेद असतील, ते दूर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सध्या काँग्रेस पक्षात इन्कमिंग सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.

माजी मुख्यमंत्री व राज्याचे बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी नगरविकास खात्याबाबत व्यक्त केलेल्या नाराजीवर ते म्हणाले, तीन पक्षांचे महाविकास आघाडी सरकार आहे. त्यामुळे थोडेफार काही घडते. मात्र त्यात बदल होतो. नगरविकासकडून निधीबाबतचा विषय होता. मुख्यमंत्र्यांना यासंदर्भात भेटलो असून त्यांनी निधी देणार असल्याचे सांगितले. दरम्यान, सातारा जिल्ह्यातील जिल्हा काँग्रेस समितीच्या रखडलेल्या निवडप्रक्रिया लवकरच मार्गी लागतील, असे सूतोवाचही त्यांनी यावेळी केले.

### मीरा भाईंदरमधील विकासकामांचे ई-भूमिपूजन

**वार्ताहर/भाईंदर**

दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कला दालन - सांस्कृतिक भवनच्या कामासह विविध कामांचे भूमिपूजन व लोकार्पण ८ नोव्हेंबर २०२० रोजी ऑनलाईन पद्धतीने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते दुपारी तीन वाजता होणार आहे. बाळासाहेब ठाकरे कलादालनाचे भूमिपूजन यावेळी केले जाणार आहे. भाईंदरच्या बाळासाहेब ठाकरे मैदानावर निर्माण केलेल्या 'कोविड सेंटर'चे लोकार्पणही होणार आहे. मीरा भाईंदर शहरासाठी 'कोविड टेस्टिंग लॅब'चेही उद्घाटन मुख्यमंत्री करणार आहेत. काशीमिरा प्रभाग क्रमांक १४ येथील अनेक वर्षांपासून निधीअभावी रखडलेल्या बीएसयूपी योजनेला राज्य शासनाने दिलेल्या अर्थसहाय्यामुळे नव्याने सुरु होत असलेल्या कामाचा शुभारंभही होणार असल्याची माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी दिली.

## नवी मुंबई महापालिका कर्मचाऱ्यांना २५ हजार बोनस

**वार्ताहर/नवी मुंबई**

दिवाळी सणानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना २५ हजार रुपये व करार तसेच तात्पुरत्या स्वरूपातील कर्मचाऱ्यांना १९ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये महापालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी तसेच राज्य शासनाकडील बदलीने प्रतिनियुक्ती, प्रशिक्षणार्थी अधिकारी - कर्मचाऱ्यांना २५ हजार सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. पालिका प्रशासनाने यंदा भरघोस बोनस जाहीर केल्याने पालिका कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

नवी मुंबई महापालिकेतील किमान वेतनावरील तात्पुरत्या स्वरूपात करार पध्दतीवरील वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असणारे अधिकारी, कर्मचारी, रोजंदारीवरील आरोग्य सेवक, मानधनावरील बालवाडी शिक्षक व मदतनीस यांना १९ हजार रुपये इतकी सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे.

याशिवाय सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रशासनाने कंत्राटी तत्वावर नेमलेले व प्रशासनाकडून मानधन प्राप्त होणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही करार पद्धतीवरील कर्मचाऱ्यांप्रमाणे १९ हजार रूपये इतके सानुग्रह अनुदान त्याचप्रमाणे आरोग्य विभागातील आशा वर्कर यांना ९ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे.

सध्याच्या कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी सुरूवातीपासून कोव्हीड विरोधातील लढ्यात अत्यंत समर्पित भावनेने काम करीत असून त्यांची दिवाळी आनंदात जावी याकरिता प्रशासक तथा आयुक्त अभिजीत बांगर यांनी घेतलेल्या या कर्मचारीहिताय निर्णयाचे अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वागत केले आहे.

## कल्याण, डोंबिवलीत सीसीटीव्हीची नजर

**वार्ताहर/कल्याण**

कल्याण- डोंबिवली शहरात सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेतून सिग्नल आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. मार्चअखेर पर्यंत हे काम पूर्ण होईल. महत्त्वाच्या सर्व चौकात एक हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार असून, त्यामध्ये अत्याधुनिक प्रकारचे कॅमेरे बसवण्यात येणार आहे.

वाहतूक पोलिसांच्या मदतीने पालिका प्रशासनाने सिग्नल आणि सीसीटीव्ही कुठे बसवावे याची स्थान निश्चित करण्यात आल आहे. शहरात २० ठिकाणी सिग्नल आणि ३०० ठिकाणावर ९०० ते १००० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात डिसेंबर अखेरपर्यंत १० सिग्नल



यंत्रणा कार्यान्वित करणार असून आतापर्यंत ४० सीसीटीव्ही कॅमेरा सुरु करण्यात आले आहेत. तर १४० कॅमेरा बसविण्यात आले आहेत.

नोव्हेंबर अखेरपर्यंत २०० कॅमेरा बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, मार्च अखेरपर्यंत सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही आणि सिग्नलचे काम पूर्ण केले जाणार आहे. या कॅमेऱ्यांचे नियंत्रण पालिका मुख्यालयातील स्मार्ट सिटी कार्यालयासह पोलीस उपायुक्त कार्यालयातून करण्यात येणार आहे.

## अंमली पदार्थप्रकरणी दोघांना अटक

**वार्ताहर/नवी मुंबई**

कोपरखैरणे भागात मेथाम्फेटामाईन या अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. विरेंद्र सुंदर पुजारी (४३) व मिथुन गोपाळ पुजारी (३१) अशी या दोघांची नावे असून त्यांच्याकडून तब्बल पाच लाख सात हजार रुपये किंमतीची मेथाम्फेटामाईन पावडर जप्त केली आहे. कोपरखैरणे सेक्टर-१९ भागात गणपती तलावाच्या बाजूला दोन व्यक्ती अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची गुप्त माहिती नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने गत आठवड्यात कोपरखैरणे सेक्टर-१९ मधील गणपती तलावाच्या बाजूला सापळा लावला होता.

**हिंदुस्तान मिल्स लिमिटेड**
सीआयएन: एल१७१२१एमएच१९०४पीएलसी१९५
नोंदणीकृत आणि प्रशा. कार्या.: सर विठ्ठलदास चेंबर्स, १६, मुंबई समाचार मार्ग, मुंबई-४०० ००१.
फोन : २२०४०८४६ ■ फॅक्स: २२८३३८४१,
ई-मेल : contact@hindoostan.com ■ www.hindoostan.com

३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही करिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांच्या विवरणाचा उतारा (रु. लाखात)

| तपशील | संपलेली तिमाही ३० सप्टेंबर, २०२० | ३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेले अर्ध वर्ष | संपलेली तिमाही ३० सप्टेंबर, २०१९ |
|---|---|---|---|
| | (अलेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) |
| प्रवर्तनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | १,४०१.१५ | १,९९२.१६ | ३,५११.०८ |
| कालावधीसाठी निव्वळ (तोटा) (कर आणि अनन्यसाधारण बाबींपूर्वी) | (२९६.२१) | (४९९.५५) | (१९४.६२) |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ (तोटा) | (२९६.२१) | (४९९.५५) | (१९४.६२) |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ (तोटा) | (२९६.२१) | (४९९.५५) | (१९६.०२) |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न | (२९३.४०) | (४९४.०४) | (१९३.९३) |
| समभाग भांडवल | १६६.४५ | १६६.४५ | १६६.४५ |
| प्रति समभाग प्राप्ती (प्रत्येकी रु. १०/- चे) मूलभूत : | (१७.८०) | (३०.०१) | (११.७८) |
| सौम्यिकृत : | (१७.८०) | (३०.०१) | (११.७८) |

टीप :
सेबी (लिस्टिंग अॅन्ड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे सादर केलेल्या तिमाही वित्तीय निष्कर्षांच्या तपशिलवार विवरणाचा उतारा वर देण्यात आला आहे. तिमाही वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्सचेंज वेबसाईट म्हणजेच www.bseindia.com आणि कंपनी वेबसाईट www.hindoostan.com येथे उपलब्ध आहे.


हिंदुस्तान मिल्स लि. करिता
सही/-
खुशाल ठाकरसी
कार्यकारी संचालक

ठिकाण : मुंबई
दिनांक : नोव्हेंबर ७, २०२०

## कोरोनाबाधितांच्या संख्येत घट : भुजबळ

**प्रतिनिधी/ मुंबई**

सगळ्याच जगावर गेल्या काही महिन्यांपासून कोरोना नावाच्या विषाणूने थैमान घातले आहे; सध्या तरी रुग्णसंख्येचा दर घटत असल्याने एक सकारात्मकता आलेली आहे. तरीही शेवटचा माणूस कोरोनामुक्त होईपर्यंत आपण काळजी घेणे आवश्यक असल्याचे



प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षक मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ यांनी केले. पालकमंत्री भुजबळ यांच्या हस्ते मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत २ कोटी ६ लक्ष निधीतून गवंडगाव ते भागवत वस्ती रस्त्याची सुधारणा कामाचे भूमिपूजन तसेच गवंडगाव येथे स्थानिक विकास निधीतून १० लक्ष रुपये किंमतीच्या सभामंडप कामाचे उद्घाटन झाले.

यावेळी छगन भुजबळ म्हणाले, कोरोनामुळे राज्याचा अधिकाधिक खर्च हा आरोग्य विभागासाठी खर्च होत आहे; कारण 'जान है तो जहाँ है'. जर माणूस असेल तरच सर्व काही आहे. विकासकामे होत जातील आणि शासनस्तरावर आपण प्रयत्न करून मतदारसंघात अधिकाधिक विकास कामे होण्यासाठी निधी आणू आणि ते विकासकामे मार्गी लागण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील. कोरोनाला रोखण्यासाठी समाजात काही ठिकाणी अटकाव करण्यात आला होता; मात्र, अर्थव्यवस्था सुरू रहावी यासाठी शासन हळूहळू सर्व पूर्वपदावर आणत असून लवकरच सर्व व्यवहार पूर्व पदावर येतील.शेतकऱ्यांच्या कांदा साठवणुकीवर बंधने आली तर त्याचा परिणाम हा थेट शेतकऱ्यांवर होतो. त्यामुळे शेतकरी हिताचे निर्णय केंद्र सरकारने घ्यावे, असेही त्यांनी सांगितले.

**आवास फायनान्शियर्स लिमिटेड**
SAPNE AAPKE, SAATH HAMAARA
(पूर्वी एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड अशी ज्ञात)(सीआयएन: यु६५९२२आरजे२०११पीएलसी०३४२९७)
नों. आणि कॉर्पो. कार्यालय : २०१-२०२, २ रा मजला, साऊथ एंड स्क्वेअर, मानसरोवर इंडस्ट्रियल एरिया, जयपूर-३०२०२०.

कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी **आवास फायनान्शियर्स लिमिटेडचे (पूर्वी ''एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड'' अशी ज्ञात)** प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ९ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून सदर सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांत संबंधित सूचनेत नमूद केलेली रक्कम प्रदान करण्यासाठी खालील नमूद कर्जदारांना बोलाविण्याकरिता मागणी सूचना जारी केलेली आहे.
कर्जदारांनी सदरहू रक्कम प्रदान करण्यास कसूर केलेली आहे म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद तारखेस सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) सहवाचता सदरहू नियमावलीच्या नियम ९ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा कब्जा घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा कोणताही व्यवहार हा खालील नमूद रक्कम आणि त्यावरील पुढील व्याज या रकमेकरिता **आवास फायनान्शियर्स लिमिटेडच्या (पूर्वी ''एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड'' अशी ज्ञात)** च्या प्रभाराच्या अधीन राहील.

| कर्जदाराचे नाव | मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम | मिळकतीचे वर्णन | कब्जाची तारीख आणि प्रकार |
|---|---|---|---|
| **नंदगोपाल रमण उदियार,** विजयलक्ष्मी नंदगोपाल उदियार, (खाते क्र.) एलएनटीएचए००३१६-१७००४३५४५ | **६ फेब्रु, २० ६ फेब्रु. २०२० रोजीस रु. ९६१७०६.४१/- थकीत** | सव्हे क्र.६/२, ६/३, ९/१, ९/२, १०/२ए/१, १०/४ए/१, १०/६, १२/१ए/१, १२/६ए, १२/५, १०/९, फ्लॅट क्र. ४०९, ४था मजला, बिल्डिंग क्र. के२, एक्झारबिया वरई., गाव वरई तर्फे वरेडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, महाराष्ट्र. **मोजमापित ३०.९४ चौ. फू.** | ६-नोव्हे-२०२०रोजी सांकेतिक कब्जा घेतला |

ठिकाण : जयपुर दिनांक : ०८-११-२०२० प्राधिकृत अधिकारी, आवास फायनान्शियर्स लिमिटेड

**केमबाँड केमिकल्स लिमिटेड**
सीआयएन:एल२४१००एमएच१९७५पीएलसी०१८२३५
नोंदणीकृत कार्यालय : केमबाँड सेंटर, इएल-७१, महापे एमआयडीसी, नवी मुंबई-४०० ७१०.
ई-मेल आयडी : info@chembondindia.com वेबसाईट : www.chembondindia.com

३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्धवर्षाकरिता एकत्रित अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा
(रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | संपलेले अर्ध वर्ष | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०९.२०२० | ३०.०९.२०१९ | ३०.०९.२०२० | ३०.०९.२०१९ | ३१.०३.२०२० |
| | | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| १ | **कामकाजातून मिळालेले एकूण उत्पन्न** | ६,८८९.१३ | ६,५९७.७३ | १२,४१४.६९ | १३,८४८.६१ | २७,१०८.०६ |
| २ | **सामान्य कामकाजातून मिळालेला निव्वळ नफा करपूर्व (अपवादात्मक व असाधारण बाबींपूर्वी)** | ४७४.६८ | ३१६.२१ | १,१३६.३५ | ८७५.९८ | ७८९.२१ |
| ३ | निव्वळ नफा कालावधीसाठी करपूर्व (अपवादात्मक व असाधारण बाबीनंतर) | ४७४.६८ | ३१६.२१ | १,१३६.३५ | ८७५.९८ | ७८९.२१ |
| ४ | निव्वळ नफा कालावधीसाठी करपश्चात (अपवादात्मक व असाधारण बाबीनंतर) | ३४३.५१ | १५४.९४ | ७४७.३२ | ५६७.०५ | ३०८.५० |
| ५ | एकूण सर्वांगीण उत्पन्न कालावधीसाठी (ज्यात कालावधीसाठीच्या नफा (करपश्चात) आणि इतर सर्वांगीण उत्पन्न (करपश्चात) चा समावेश आहे) | ३३१.३२ | १४५.२२ | ७२०.१२ | ५४७.६१ | ३४९.२५ |
| ६ | पेड अप इक्विटी भाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. ५ प्रति भाग) | ६७२.४१ | ६७२.४१ | ६७२.४१ | ६७२.४१ | ६७२.४१ |
| ७ | रिझर्वज् (मागील लेखावर्षाच्या ताळेबंदात दाखवल्यानुसार रिव्हॅल्युशन रिझर्व्हज् वगळता) | - | - | - | - | २६,१९५.५३ |
| ८ | प्रति भाग उत्पन्न (रु. ५ प्रत्येकी) (अवार्षिक) मूलभूत आणि सौम्यिकृत ईपीएस | २.३५ | १.१४ | ५.०९ | ४.१४ | १.३९ |

टिपा :
१. वरील निकाल ३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही व अर्धवर्षाकरिता असून त्यांचे पुनर्विलोकन लेखापरीक्षण समितीने केलेले आहे, संचालक मंडळानी ७ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या सभेत त्याला मंजुरी दिलेली आहे व स्टॅच्युटरी ऑडिटर्सनी त्यांचे मर्यादित पुनर्विलोकन केले जाण्याचा अधीन होते.
२. हे विवरण कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित केलेल्या कंपनीज (इंडियन अकाऊंटिंग स्टॅंडर्डस्) रुल्स, २०१५ (इंड-एएस) आणि प्रयोज्य असतील त्या प्रमाणांत अन्य मान्यताप्राप्त लेखा पद्धती आणि धोरणे यांच्या अनुषंगाने बनवले आहे.
३. कोव्हिड-१९ ने ग्रुपच्या कामकाजावर परिणाम झाला आहे. अर्थ व्यवस्थेवरील टाळेबंदी उठवण्यासाठी अनेक उपाय जून, २० पासून योजले जात असले तरी अजुनही साथीच्या भविष्यातील स्थितीव व शासकीय निर्देशांवर सामान्य व्यवसायाची स्थिती अवलंबून आहे. व्यवस्थापनाने वित्तीय निष्कर्ष बनवतांना कोव्हीड-१९ चा परिणाम विचारात घेतला आहे. आणि ग्रुप जवळून त्यावर लक्ष ठेवून आहे. भविष्यातील आर्थिक स्थितीच्या करेंट इंडिकेटरवर आधारित ग्रुपला त्यांच्या मत्तेची रक्कम वसुल करण्याची अपेक्षा आहे. एकत्रित वित्तीय निष्कर्षावरील कोव्हिड-१९ चा परिणाम हा सदर निष्कर्षाच्या तारखेस अंदाजापेक्षा वेगळा असू शकतो. ग्रुप काही असल्यास सदर परिस्थितीमुळे प्रतिकूल परिणाम न होण्यासाठी वेळोवेळी व्यवस्था करीत आहे.
४. अलिप्त आर्थिक निकालांमधील महत्त्वाच्या संख्या
(रु. लाखांत)

| | संपलेली तिमाही | | संपलेले अर्ध वर्ष | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | ३०.०९.२०२० | ३०.०९.२०१९ | ३०.०९.२०२० | ३०.०९.२०१९ | ३१.०३.२०२० |
| | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| **कामकाजातून मिळालेले एकूण उत्पन्न (निव्वळ)** | ९९५.७६ | १,२३६.०९ | १,८१५.१२ | ३,३९४.३९ | ५,८५४.२९ |
| **करपूर्व नफा** | २४५.७२ | ११३.९४ | ५९२.६० | ४४७.७७ | ५३०.७९ |
| **करपश्चात नफा** | १९०.९३ | ५६.६० | ४४६.१९ | ४०६.६८ | ५५४.१५ |

५. वर दिलेली माहिती हा स्टॉक एक्स्चेंजेसकडे सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) नियम, २०१५ च्या नियम ३३ खाली सादर केलेल्या एकत्रित तिमाही आर्थिक निकालांच्या सविस्तर विवरणाचा उतारा आहे. एकत्रित आणि अलिप्त तिमाही आर्थिक निकालांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंज वेबसाईट म्हणजेच www.bseindia.com व www.nseindia.com आणि कंपनीच्या वेबसाईटवर **www.chembondindia.com** येथे उपलब्ध आहे.

केमबाँड केमिकल्स लिमिटेडसाठी
सही/-
समीर व्ही. शाह
चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर

ठिकाण : मुंबई.
तारीख : ०७ नोव्हेंबर, २०२०

**इंडियन ओव्हरसीज बँक**
पवई शाखा
३२-४१, तळमजला, पवई प्लाझा, हिरानंदानी गार्डन्स, आदिशंकराचार्य मार्ग, पवई, मुंबई-४०० ०७६
इमेल: job1946@iob.in, : दूर.: ०२२-२५७०८९९७/०२२-२५७०८९९८

कब्जा सूचना [(नियम ८ (१)]

ज्याअर्थी,
निम्नस्वाक्षरीकारांनी **इंडियन ओव्हरसीज बँक** चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **१३.०२.२०२०** रोजी एक मागणी सूचना जारी करून कर्जदार **श्री. सय्यद असद अब्बास आणि श्रीम. सय्यद जाफ्री फातीमा,** फ्लॅट क्र. ३०२, ३ रा मजला, इमारत क्र. ३, बी विंग, स्वागत सिएचएसएल, दामोदर पार्क, घाटकोपर पश्चिम - ४०००८६, सी.टी.एस. क्र. ३६६, ३६६१/८, ३७५(पीटी) तालुका/वॉर्ड अंधेरी गाव माजस मुंबई-४०००८६ (यानंतर कर्जदार असे उल्लेखावे) आणि हमीदार अंतर्गत असे सूचनेतील नमूद रकमेच्या परतफेडीकरिता सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

१) **श्रीम. साधना राऊत**
बी/५०१, त्रिनिटी सोसायटी
हिरानंदानी हॉस्पिटल जवळ
पवई, मुंबई - ४०००७६

२) **श्रीम. अनिता राघव**
फ्लॅट क्र. ४२, ए विंग महेश इमारत
अबान पार्क सोसायटी, धाकोली
ठाणे पश्चिम - ४००६०७

३) **श्री. झहीर हसन**
फ्लॅट क्र ४०३, ४था मजला, इमारत क्र.
३ बी स्वागत को. ऑप. हाऊसिंग सोसायटी
दामोदर पार्क, घाटकोपर, पश्चिम, मुंबई-४००० ८६.

सह वसुलीच्या दिनांकापर्यंत सांपवार्षिक दराने पुढील व्याज आणि दर, प्रभार इ.

| अनु. क्र. | कर्जाचा प्रकार | लाखामधील मर्यादा | व्याजाचे दर | १३.०२.२०२० रोजीप्रमाणे एकूण देय |
|---|---|---|---|---|
| १ | हाऊसिंग कर्ज १ १९४६०३३५१००००००१ | २९.५० | ८.८०% | २६,६४,६२०/- |
| २ | हाऊसिंग कर्ज २ १९४६०३३५१००००००३ | ५.०० | ८.८०% | १,२४,५४७/- |
| | | | एकूण | २७,८९,१६७/- |

(१) रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा कब्जा त्याला/तिला सदर अॅक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर रुल्सच्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ह्या ४ नोव्हेंबर २०२० रोजी घेतला.
(२) विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, मिळकतीशी व्यवहार करू नये आणि अशा मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा इंडियन ओव्हरसीज बँकच्या रक्कम २८,६४,९९७/- ०२.११.२० रोजीप्रमाणे मागणी सूचना जारी केल्यानंतर काही असल्यास भरणाच्या प्रदानाच्या दिनांकापर्यंत मागणी सूचनेतील उपरोक्त नमूद दिनांकापासून सांपार्श्विक दर आणि आधाराप्रमाणे त्यावरील पुढील व्याज, प्रभार इ. रकमेसाठी भाराअधीन राहील. कब्जा घेतल्याच्या दिनांकारोजी भरणाच्या दिनांकापर्यंत **रू. २८,६४,९९७/-** देयासह सांपार्श्विक दर आणि आधारे पुढील व्याज, प्रभार इ. होती.
३) तारण मत्ताच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत अॅक्टचे कलम १३ चे उप-कलम (८) च्या तरतुदीनुसार कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

**श्री. सय्यद असद अब्बास आणि श्रीम. सय्यद जाफ्रि फातिमा** चे समाविष्ट मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग. फ्लॅट क्र. ३०२, ३ रा मजला, इमात क्र. ३, बी विंग, स्वागत सिएचएसएल, दामोदर पार्क, घाटकोपर पश्चिम - ४०००८६
सी.टी.एस. क्र. ३६६, ३६६१/८, ३७५ (पार्ट) तालुका/वॉर्ड अंधेरी गाव, माजस मंबई-४०००८६.
**श्री. सय्यद आसद अब्बास आणि श्रीम. सय्यद जाफ्रि फातिमा यांच्या नावे असलेली आणि** सीबाबद्ध मिळकती लगत
उत्तर : रोड
दक्षिण : रोड
पूर्व : खुले
पश्चिम : इमारत

दिनांक : ०८.११.२०२०
ठिकाण : मुंबई
प्राधिकृत अधिकारी
इंडियन ओव्हरसीज बँक

## मारुती चितमपल्ली यांना पक्षीमित्र जीवनगौरव पुरस्कार

**प्रतिनिधी /नागपूर**

महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेतर्फे दिला जाणारा महाराष्ट्र पक्षीमित्र जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ निसर्ग अभ्यासक मारुती चितमपल्ली यांना जाहीर करण्यात आला आहे. दिवंगत पक्षीतज्ज्ञ रमेश लाडखेडकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो.

विदर्भ पक्षीमित्र मंचाच्या वतीने डॉ. अनिल पिंपळापुरे यांनी हा जीवनगौरव पुरस्कार प्रायोजित केला आहे. याशिवाय, इतर तीन पुरस्कारांचीही घोषणा देखील संघटनेने केली आहे. डॉ. जी. एन. वानखडे स्मृती पक्षी संवर्धन आणि सुश्रृषा पुरस्कार जळगाव जिल्ह्यातील तांदलवाडी येथील उदय सुभाष चौधरी यांना देण्यात येणार आहे. रोखरक्कम, मानपत्र आणि स्मृतीचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे.

डॉ. व्ही.सी.आंबेडकर स्मृती पक्षी संशोधन पुरस्कार अचलपूरचे डॉ. अमोल रावणकर आणि अमरावतीचे किरण मोरे यांना विभागून दिला जाईल. वाइल्डलाइफ हेरिटेज कॉन्झव्हेशन सोसायटी, नाशिकतर्फे हा पुरस्कार दिला जाणार आहे. ईश्वरदयाल गौतम स्मृती पक्षी जनजागृती पुरस्कार नाशिकचे सतीश गोगटे यांना जाहीर करण्यात आला आहे.

पालघर येथील नेस्ट संस्थेने हा पुरस्कार प्रायोजित केला आहे. यंदाचे ३४ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन सोलापूर येथे होणार असून तेथे या पुरस्कारांचे वितरण केले जाईल, अशी माहिती पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी दिली.

## कार अपघातात एकाचा मृत्यू

**प्रतिनिधी/वाशिम**

वन्यपशू आडवा आल्याने कार रस्त्याच्या खाली उतरून पलटी झाल्याने एक जण ठार तर दोन गंभीर जखमी झाल्याची घटना मध्यरात्री कारंजा-अमरावती मार्गावरील मालेगाव गॅस प्लँटजवळ घडली. रमीज खान सैद खान (रा. मंगळूरपीर) असे मृताचे नाव आहे. स्वतःच्या मालकीच्या कार ने तिघे जण अमरावतीला ऑटो पार्टस खरेदीकरिता गेले होते. परत येत असताना गाडीसमोर अचानक वन्यपशू आडवा आल्याने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या किलोमीटर दगडाला धडकून शंभर फूट फेकल्या गेली.

epaper.freepressjournal.in